Estd. 1962
"A++" Accredited by
NAAC (2021)
With CGPA 3.52

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR**
**416 004, MAHARASHTRA**
PHONE : EPABX – 2609000, BOS Section – 0231-2609094, 2609487
Web : www.unishivaji.ac.in Email: bos@unishivaji.ac.in
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर ४१६ ००४, महाराष्ट्र**
दूरध्वनी - इपीबीएक्स - २०६०९०००, अभ्यासमंडळे विभाग : ०२३१- २६०९०९४. २६०९४८७
वेबसाईट : www.unishivaji.ac.in ईमेल : bos@unishivaji.ac.in

जा.क्र./शि.वि/अं.म./ 194 दिनांक:— २८/०३/२०२५

प्रति,

अधिविभाग प्रमुख/ संचालक,
सर्व सबंधित अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**विषय :—** SWAYAM Credit Course च्या SOP / Guidelines बाबत.

महोदय/ महोदया,

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, विद्यापिठ अनुदान आयोगाच्या दि.२७/०८/२०२४ रोजीच्या अधिसूचना D.O.F No.1-8/2017 (SWAYAM) बाबत SWAYAM Advisory Committee अंतर्गत "Framework for Universities to conduct Examinations for SWAYAM Courses", च्या दृष्टीने विद्यापीठ अधिविभागातील विनाअनुदानित (Self funded) अभ्यासक्रमांना एक स्वयंम कोर्स अनिवार्य करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने स्वयंम कोर्सच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने SOP /Guideline तयार करण्यात आली असून त्याची प्रत सोबत जोडली आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सदर SOP / Guideline सर्व संबंधित शिक्षक व विद्यार्थी यांच्या निदर्शनास आणावे.

कळावे.

आपला विश्वासू,

(डॉ. एस. एम. कुबल)
उपकुलसचिव
अभ्यास मंडळे विभाग

सोबत — वरील प्रमाणे

प्रत— माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा. कुलगुरु कार्यालय | २ | मा. प्र—कुलगुरु कार्यालय |
| ३ | मा. संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ कार्यालय, | ४ | सर्व अधिष्ठाता |
| ५ | संचालक, तंत्रज्ञान अधिविभाग | ६ | अध्यक्ष, सर्व अस्थायी / अभ्यास मंडळे |
| ७ | संचालक, संगणक केंद्र / आयटी सेल | ८ | सर्व ऑन परिक्षा |
| ९ | पात्रता अधिविभाग | १० | परिक्षक नियुक्ती अ व ब विभाग |
| ११ | आयक्युएसी | | |

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## SWAYAM कोर्ससाठी आवश्यक असणारी SOP खालील प्रमाणे

- **क्रेडिट ट्रान्सफरसाठी निवडलेल्या SWAYAM कोर्सेची परीक्षाबाबतची नियमावली :**

1) शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी **SWAYAM** कोर्स हे विद्यापीठ अधिविभागातील फक्त विना अनुदानित अभ्यासक्रमाना लागू राहतील.
2) क्रेडीट ट्रान्सफर साठी घेतलेल्या **SWAYAM** कोर्सची सत्रांत परीक्षा विद्यापीठ घेईल.
3) क्रेडीट ट्रान्सफर साठी निवडलेल्या **SWAYAM** कोर्सचे प्रश्न पत्रिकेचे स्वरूप व सत्रांत परीक्षा विद्यापीठाच्या प्रचलित नियमानुसार राहील.
4) क्रेडीट ट्रान्सफर साठी निवड केलेल्या कोर्सच्या सत्रांत परीक्षेसाठी ७०% गुण असतील.
5) **SWAYAM** Course Coordinator (Subject Matter Expert) विद्यार्थ्यांनी **SWAYAM** प्लॅटफॉर्मवर सबमिट केलेल्या असाइनमेंट आणि क्विझेसचे मूल्यमापन करतो. त्यांचे गुण **SWAYAM** प्लॅटफॉर्मवरील विद्यार्थ्यांच्या खात्यात प्रतिबिंबित होतात. **SWAYAM** वरील असाइनमेंट आणि क्विझेससाठी 30% गुण आहे.
6) **SWAYAM** कोर्स उत्तीर्ण होण्यासाठी किमान 40% गुण आवश्यक आहेत (म्हणजेच असाइनमेंट / क्विझेस मध्ये किमान 12/30 गुण आणि सत्रांत परीक्षेत किमान 28/70 गुण आवश्यक आहेत).
7) जर विद्यार्थी **SWAYAM** पोर्टलवरील असाइनमेंट / क्विझेसला अनुत्तीर्ण झाले, तर विभाग स्तरावर अंतर्गत परीक्षा घेतली जाईल. मात्र, असे विद्यार्थी **SWAYAM** पोर्टलद्वारे क्रेडीट हस्तांतरणासाठी पात्र राहणार नाहीत.
8) क्रेडीट ट्रान्सफर साठी निवडलेल्या **SWAYAM** कोर्सचे क्रेडीट / गुण हे गुणपत्रिकेत स्वतंत्र पणे नमूद होतील.
9) **SWAYAM** कोर्स हे फक्त फ्रेश विध्यार्थ्यांसाठी असेल
10) SWAYAM कोर्सचे मूल्यमापन हे ७० : ३० नुसार असल्याने विद्यापीठाच्या मुल अभ्यासक्रमाशी कोर्सचे कोणतेही मूल्यमापनाचे प्रमाण असले तरी त्याचे रुपांतर हे ७० : ३० च्या अनुषंगाने गुणात केले जाईल.

- **स्वयम अभ्यासक्रमाच्या क्रेडिट्सची समकक्षता :**

**1)** जर विद्यापीठाच्या अभ्यासक्रमातील कोर्सचे क्रेडीट त्या ऐवजी निवडलेल्या SWAYAM कोर्सच्या क्रेडीट पेक्षा जास्त असतील तर त्यासाठी (उदा. विद्यापीठ कोर्स ४ क्रेडीट व स्वयम ३ क्रेडीट)

अ) आवश्यक क्रेडीट पूर्ण करण्यासाठी SWAYAM कोर्सच्या समकक्ष असलेल्या विद्यापीठाच्या कोर्स मधील अधिकचा अभ्यासक्रम उर्वरित क्रेडीट साठी समावेश करावा हा अधिकच अभ्यासक्रम आवश्यक अतिरिक्त क्रेडीटशी सुसंगत असावा. ह्या अधिकच्या अभ्यासक्रमाचा समावेश SWAYAM अभ्यासक्रम सोबतच परीक्षे मध्ये करावयाचा आहे.

आ) हा अतिरिक्त अभ्यासक्रम अधिविभागातील नियुक्त SWAYAM Course Facilitator द्वारे शिकविला जाईल

उदा.

i) जर विद्यापीठ कोर्स ४ क्रेडीटचा असेल व SWAYAM कोर्स ३ क्रेडीटचा असेल तर विद्यापीठ कोर्समधील १ क्रेडीटशी सुसंगत अधिकचा अभ्यासक्रमचा समावेश करावा.

ii) सत्रांत परीक्षा SWAYAM Portal वरील ३ क्रेडीट व विद्यापीठाच्या अधिकच्या १ क्रेडिटच्या एकत्रित अभ्यासक्रमावर होईल.

*2) सदर निवडलेल्या SWAYAM अभ्यासक्रमाचे क्रेडीट विद्यापीठाच्या क्रेडीट पेक्षा जास्त असेल तर SWAYAM क्रेडीट ग्राह्य धरावे.*

***अ)*** *सदर सेमिस्टर साठी लागणाऱ्या एकूण क्रेडीट हे उच्चतम पातळीवरील असतील व SWAYAM क्रेडीटसह बेरीज हि पाहिजे असलेल्या क्रेडीट पेक्षा जास्त होत असेल तर, विद्यापीठाच्या त्याच सेमिस्टर मधील एक कोर्स निवडून त्याचे आवश्यक क्रेडीट कमी करावे जेणेकरून त्या सेमिस्टरचे एकूण क्रेडीट उच्चतम पातळी पेक्षा जास्त होणार नाही.*

*उदा. – MCA भाग १ मधील Web Technology या विषयात विद्यापीठाचे कोर्सचे क्रेडीट २ क्रेडीट आहेत व त्याएवजी निवडलेल्या SWAYAM कोर्स चे क्रेडीट ४ आहेत. तर SWAYAM कोर्सचे क्रेडीट ४ ठेवावे व त्या एवजी त्या सेमिस्टर मधील Software Engineering हा कोर्स ४ क्रेडिटचा असून त्याचे २ क्रेडीट कमी करून २ क्रेडिटचा अभ्यासक्रमावर अंतर्गत व विद्यापीठ सत्रात परीक्षा घ्यावी.*

***ब)** सदर सेमिस्टर साठी लागणारे एकूण क्रेडीट हे नुयुत्तम पातळीवर असतील व SWAYAM किंवा एकूण किती क्रेडीट असावे हे शिखर संस्थेने निश्चित केलेले नसेल तर अश्या अभ्यासक्रमाच्या कोर्ससाठी SWAYAMचे एकूण क्रेडीट ग्राह्य धरावे.*

*उदा. – **i)** मानव्यशास्त्र विद्याशाखेमध्ये पद्वूत्तर पदवीच्या सत्राचे structure हे शासन नियमाप्रमाणे २०-२२ क्रेडीटचे आहेत तर विद्यापीठाने ते नुयुत्तम पातळीवरील २० क्रेडीट घेतले आहेत अशा ठिकाणी SWAYAM चे सर्व क्रेडीट ग्राह्य धरता येतील. परंतु त्या सत्रासाठी एकूण क्रेडीट २२ क्रेडीट पेक्षा जास्त नसावेत.*

***ii)** विधी अभ्यासक्रमामध्ये Bar Council चे किती क्रेडीट असावे हे निश्चित केलेले नाहीत. फक्त अभ्यासक्रम नमूद आहे. LLM चे विद्यापीठ अभ्यासक्रमास एकूण ७२ म्हणजे प्रती सेमिस्टर १८ याप्रमाणे निश्चित केले आहेत. त्यामुळे येथे SWAYAM चे सर्व क्रेडीट ग्राह्य धरता येईल.*

*3) सदर बदलाच्या अनुषंगाने अभ्यासक्रमाचे आराखडा व इतर बाबी या साठी अभ्यासक्रम विभागाने योग्यती कार्यवाही करावी.*

उपकुलसचिव

26/03/2025
समन्वयक
स्वयम

26/03/25
अधिष्ठाता
मानवविज्ञान विद्याशाखा

अधिष्ठाता
वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा

प्र.अधिष्ठाता
विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा

अधिष्ठाता
अंतर विद्याशाखिय
अभ्यास विद्याशाखा